**<u>ठळक बातम्या</u>**

- तामिळनाडूतल्या सर्व, तर पश्चिम बंगालमधल्या पहिल्या टप्प्यासाठीच्या विधानसभा मतदारसंघांमधल्या निवडणुकांसाठी उद्या मतदान

- इराणबरोबरची शस्त्रसंधी अमर्यादित काळासाठी वाढवत असल्याची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

- महाराष्ट्रातल्या विविध धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०२ टीएमसी जास्त पाणीसाठा

- २ लाख ५६ हजार १३७ कोटी रुपयांच्या विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना प्रोत्साहन द्यायला राज्य सरकारची मान्यता

**आणि**

- केंद्र सरकारकडून आज ऑनलाइन गेम्ससाठीचे नियम जारी

**<><><><><>**

तामिळनाडू विधानसभेच्या सर्व जागांसाठी आणि पश्चिम बंगाल विधानसभेच्या पहिल्या टप्प्यासाठीचं मतदान उद्या होणार आहे. तामिळनाडू विधानसभेच्या सर्व म्हणजेच २३४ मतदारसंघांसाठी एकाच टप्प्यात मतदान होईल. पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात १६ जिल्ह्यांमधल्या १५२ मतदारसंघांत एकूण ४४ हजार ३७६ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या एकूण दोन हजार ४०७ तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग केलं जाणार असल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगानं दिली आहे. सर्व मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून संशयित व्यक्तींना ताब्यात घेण्यात आलं आहे तसंच सीमावर्ती भागात पाळत ठेवण्यात येत आहे.

महाराष्ट्रातल्या बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठीही उद्या मतदान होणार आहे.

**<><><><><>**

इराणसोबतची शस्त्रसंधी अमर्याद काळासाठी वाढवण्यात आल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. इराणसोबत चर्चा करण्यासाठी हे आवश्यक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. इराणसोबतची दोन आठवड्यांची शस्त्रसंधी आज सकाळी संपली, त्या पार्श्वभूमीवर  ट्रम्प  यांनी ही घोषणा केली आहे. पाकिस्तानचे प्रधानमंत्री शाहबाज शरीफ आणि फिल्ड मार्शस असीम मुनीर यांच्या विनंतीवरून आपण हा निर्णय घेतल्याचंही त्यांनी सांगितलं. मात्र अमेरिकन नौदल इराणच्या बंदरावरची नाकेबंदी सुरूच ठेवेल असंही त्यांनी स्पष्ट केलं.

इराणनं शस्त्रसंधीची मुदत वाढवण्याबाबत कसलीही मागणी केली नव्हती असं इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डशी संबंधित तसनिम वृत्तसंस्थेने म्हटलं आहे, तसंच बंदरांवरची नाकेबंदी इराण तोडेल असा इशाराही दिला आहे. संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस एँतोनियो गुटेरस यांनी ट्रम्प यांच्या घोषणेचं स्वागत केलं आहे.

इराणचं निमलष्करी दल रिव्हॉल्युशनरी गार्डने आज सकाळी होर्मुजच्या सामुद्रधुनीत दोन मालवाहू जहाजांवर हल्ला केला. यात जीवितहानी झाल्याचं कुठलंही वृत्त नाही.

दरम्यान, हिजबोलानं आज इस्त्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला केला. इस्त्रायलने शस्त्रसंधीचं उल्लंघन करत दक्षिण लेबननमधे हल्ले केल्यानंतर पहिल्यांदाच हा हल्ला केल्याचं हिजबोलानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विविध धरणांमध्ये सुमारे ६५४ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती आज मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०२ टीएमसी पाणीसाठा जास्त आहे. गेल्या वर्षी हा साठा सुमारे ५५२

टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या अनियमततेमुळे पुढच्या वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं.

एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२ टक्के, तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती, असं जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करून २ लाख ५६ हजार १३७ कोटी रुपयांच्या विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना प्रोत्साहन द्यायला सरकारनं मान्यता दिली आहे. यामुळे एक लाखांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची १४ वी बैठक आज मुंबईत झाली, त्यानंतर ते बोलत होते.

या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण २०२६ आज राज्य सरकारने जाहीर केलं. आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरणामुळे घनकचऱ्याचं पर्यावरणपूरक व्यवस्थापन तसंच हरित गृह वायू उत्सर्जन कमी होण्यास मदत होणार आहे. तसंच शहरांतल्या कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीनं लावणं शक्य होणार आहे. त्याचबरोबर कचरा साठवण्यामुळे निर्माण

होणाऱ्या विविध समस्या, पाण्याच्या स्त्रोतांचं प्रदूषण कमी होईल. यासाठी पाचशे कोटींची तरतूद केली आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं आज ऑनलाइन गेम्ससाठीचे नियम प्रसिद्ध केले. गेल्यावर्षी ऑगस्टमध्ये यासंदर्भातला कायदा संसदेनं मंजूर केला होता. १ मे पासून हे नियम लागू होतील. याअंतर्गत ऑनलाइन गेम्सच्या नियमनासाठी भारतीय ऑनलाइन गेमिंग प्राधिकरणाची स्थापना होणार आहे. ई-स्पोर्ट्ससह लहान मुलांसह इतरांना घातक असलेले, आर्थिक व्यवहार गुंतलेले, मोठ्या प्रमाणात लोकं सहभागी होत असलेले तसंच इतर देशात तयार केलेल्या गेम्सला केंद्र सरकारनं सांगितल्यावर या प्राधिकरणाकडे नोंदणी बंधनकारक असेल. ही नोंदणी १० वर्षांसाठी वैध असेल. पैसे भरुन खेळावे लागणाऱ्या ऑनलाइन खेळांवर देशात यापूर्वीच बंदी आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौमध्ये लखनौ सुपर जायन्टंस आणि राजस्थान रॉयल्स यांचा सामना सुरु आहे. लखनौ सुपर जायन्टंसनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा राजस्थान रॉयल्सच्या ७ षटकात ३ बाद ५४ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

शेतकऱ्यांना केवळ अन्न पुरवठादार म्हणूनच नाही तर उर्जा उत्पादक म्हणूनही सक्षम करण्याची गरज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. नवी दिल्लीत आयोजित 'सेव्ह द अर्थ कॉन्क्लेव्ह'च्या दुसऱ्या आवृत्तीला ते आज संबोधित करत होते. कचऱ्याचा पुनर्वापर आणि जैवउर्जा उत्पादनाद्वारे कचऱ्याचं संपत्तीत रुपांतर करण्याकडे गडकरी यांनी लक्ष वेधलं.

नदीजोड प्रकल्पांसह जलस्रोतांचं योग्य व्यवस्थापन केलं तर पूर आणि दुष्काळ या दोन्ही परिस्थितींशी सामना करायला मदत मिळेल, असं गडकरी म्हणाले.

**<><><><><>**

कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती आणि माहिती तंत्रज्ञान कंपन्यांचे समभाग घसरल्याचा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारांमध्ये दिसून आला. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ७५७ अंकांची घसरण झाली आणि तो ७८ हजार ५१६ अंकावर बंद झाला. निफ्टीही १९९ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ३७८ अंकांवर बंद झाला. यामुळे गेल्या ३ सत्रांमध्ये वधारलेल्या देशातल्या शेअर बाजारांच्या तेजीला लगाम लागला.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीर मधल्या पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या स्मृती दिनानिमित्त पीडितांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह इतर मान्यवरांनीही पहलगाम हल्ल्यातल्या पीडितांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**//<><><><><>//**